**दोन मजली घर भाडयाने देणे आहे**

शिवगंगानगर भाग २, गोविंदश्री मंगलकार्यालयाजवळ, (Block No - 124 ) . तळमजल्यावर - 1 BHK, पहिला मजला- एक रूम, टॉयलेट, बाथरूम, गच्ची. वैशिष्टे - नवीन colour केलेले, Compound, security Gate etc. KLE/ IMS शाळा, डि मार्ट जवळ.

संपर्क- दयानंद माशाळकर. 9423331752.
सदानंद माशाळकर 9924148970
भाडे- 12000 डिपॉझिट- 25,000.
एजंट, ब्रोकर यांनी संपर्क करु नये.



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



**लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय**

फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)

• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय

**श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट**
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १५९ वा | शनिवार, दि. २५ जानेवारी २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR



**हुरडा पार्टी**

**शालेय सहल व हुरडा पार्टी**

आनंददायी शालेय सहल व निसर्गाच्या सानिध्यात हुरडा पार्टी साठी कल्याणम कृषी पर्यटन केंद्र, काटगाव फाटा, तांदुळवाडी, हैदराबाद रोड, सोलापूर.

मो. ९८६०६३४८३४ / ९८६००९३०११

**वाडा भाड्याने देणे आहे**

बस स्थानकापासून जवळ आणि पोस्ट ऑफिससमोरील मध्यवर्ती ठिकाणी असलेला करजगी ता. अक्कलकोट या गावातील 5 हजार स्वे. फूट बांधकाम असलेला जुना वाडा तळघरासाहित भाड्याने देणे आहे. बँक, पतसंस्था, वैद्यकीय व्यवसाय आणि शासकीय कार्यालयासाठी बहुउपयोगी.

अधिक माहितीसाठी संपर्क: 9975434591


# निवडणुका झाल्या, मतं मिळाली; आधी लाडक्या बहिणी अपात्र केल्या, आता शेतकऱ्यांच्या तोंडाला पानं पुसणार!



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा निवडणुकीआधी आणलेल्या लाडकी बहीण योजनेला महायुती सरकारकडून निकषांची कात्री लावण्याचे काम सुरू आहे. यामुळे अनेक बहिणी अपात्र ठरणार आहेत, तर दुसरीकडे शेतकऱ्यांच्या तोंडालाही पाने पुसली जात आहेत.

शेतकऱ्यांची कर्जमाफीचे जाहीर आश्वासन देणारे सरकार आता यामुळे तिजोरीवर भार पडू शकतो अशी पळवाट काढताना दिसत आहे. यावरून काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी महायुती सरकारवर निशाणा साधला आहे.

विजय वडेट्टीवार यांनी शुक्रवारी सकाळी एक्सवर एक पोस्ट शेअर केली. शेतकरी कर्जमाफीसाठी दिलेले आश्वासन आता महायुती सरकारच्या मतभेदांच्या जाळ्यात अडकले आहे. निवडणुकीपूर्वी जी आश्वासनं 'जाहीरनामा' म्हणून जनतेसमोर ठेवली गेली, ती सर्व गाजरं होती, म्हणून आता अर्थमंत्र्यांच्या मते शेतकरी कर्जमाफी 'तिजोरीवरचा भार' ठरू शकते. आधी वचन देणे आणि नंतर निधीचे कारण देऊन ती पूर्ण न करणे हा जनतेचा विश्वासघात नाही का?

असा सवाल करत शेतकऱ्यांच्या कष्टाचे आणि विश्वासाचे आदर करणारे हे सरकार नाही, असा घणाघात वडेट्टीवार यांनी केला.

नागपूरमध्ये पत्रकारांशी बोलताना वडेट्टीवार म्हणाले की, या सरकारने निवडणुकीच्या वेळी लाडक्या बहिणींना 2100 रुपये देण्याची घोषणा केली होती. पण आता त्यांची पैसे देण्याची औकात नाही. उलट या योजनेतील महिलांची संख्या सरकार कमी करत आहेत.

शेतकरी कर्जमाफीवरून देखील मंत्री म्हणत आहेत की आम्ही असे आश्वासन दिले नव्हते. म्हणजे मलिदा खाण्यासाठी तिन्ही पक्ष एकत्र येणार पण शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची वेळ आली की कारणे देऊन जबाबदारी झटकायचे हे योग्य नाही. सरकार म्हणून ही सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे आता सरकारने पळ काढू नये, बेइमानी करू नये, असे वडेट्टीवार म्हणाले.

सरकार एसटी, रिक्षा, टॅक्सी भाववाढ करतील. चार वर्ष लोकांकडून पैसे घेतील आणि निवडणुका आल्या की एक हजार रुपये वाटून मत घेतील हेच या सरकारचे काम आहे, टीकाही वडेट्टीवार यांनी केली.

# सोलापूर विमानतळावरुन नागरी विमानसेवा कधी सुरू होणार?

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर विमानतळाच्या उड्डाणांसाठी नागरिक गेल्या अनेक वर्षांपासून उत्सुक आहेत. सोलापूर विमानतळाचे उद्घाटन सप्टेंबर महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मोठ्या दिमाखात करण्यात आले. मात्र, प्रत्यक्षात उड्डाण सेवा सुरु न झाल्याने येथील अर्थव्यवस्था आणि पर्यटनावर नकारात्मक परिणाम होत आहे.

सोलापूर विमानतळासाठी FI८91 एअरलाइन्स कडुन मुंबई आणि गोवा येथे 23 डिसेंबर 2024 पासून उड्डाणे सुरु करण्याचे

## DGCA कडे सोलापूरांची विचारणा




आश्वासन केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिले होते. मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळानेही सोलापूर-मुंबई आणि मुंबई-सोलापूर विमानसेवांसाठी वेळेचे स्लॉट राखीव ठेवले आहेत. परंतु प्रत्यक्षात या सेवेला अद्याप सुरुवात झालेली नाही, ज्यामुळे सोलापूरच्या विकासावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

सोलापूर विकास मंचाने या विमानतळाच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे सोलापूरकरांचे नागरी विमानसेवा सेवेचे स्वप्न प्रत्यक्षात उतरताना दिसत असतानाच प्रशासनाच्या वतीने रोज नवनवीन कारणे पुढे करुन पुढे करुन विनाकारण पुढे करुन विमानसेवा पुढे ढकलण्यात येत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे.

DGCA कडे नागरिकांची मागणीः

(पान 2 वर..)

# महापालिकेचा लिपिक लाचलुचपतच्या जाळ्यात; सदर बझार पोलिसांत गुन्हा दाखल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नोटरी पद्धतीने घेतलेल्या जागेची कर आकारणीसाठी नोंद लावण्यासाठी महापालिकेच्या कर विभागातील लिपिक चंद्रकांत दोंतूल याने तक्रारदाराकडे ५० हजार रुपये मागितले. त्यातील २८ हजार ७४५ रुपये न भरता स्वतःकडेच लाच स्वरूपात ठेवल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दोंतूल याच्यावर कारवाई केली आहे.

त्याला ताब्यात घेऊन सदर बझार पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदाराने शहराच्या हद्दवाढ भागात तीन हजार स्क्वेअर फूट जागा नोटरी करून घेतली आहे.

त्या जागेची कर आकारणी विभागाकडे नोंद करायची होती.

त्यासाठी तक्रारदाराने लिपिक चंद्रकांत दोंतूल याची भेट घेतली. त्यावेळी त्याने १ एप्रिल १९९२ ते ३१ मार्च २०२५ या काळातील एक लाख ७७ हजार ७४५ रुपयांचे शुल्क भरण्यास सांगितले. त्याचवेळी एवढा कर भरायचा नसल्यास ५० हजार रुपये द्यायला सांगितले. तेवढी रक्कम भरून पावती देतो म्हणून ५० हजार रुपये घेतले आणि त्यातील २१ हजार २५५ रुपयेच भरले, असेही तक्रारीत नमूद आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक गणेश कुंभार यांच्या नेतृत्वातील पथकाने ही कारवाई केली आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयातही आता 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष'

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** गंभीर आजारांवरील उपचारांसाठी गरजू नागरिकांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून अत्यावश्यक आर्थिक मदत पुरवली जाते. त्यामुळे या कक्षाकडे अर्ज सादर करण्याबरोबरच त्याचा पाठपुरावा करण्यासाठी रुग्ण व त्यांचे नातेवाईकांना मंत्रालयात यावे लागते.



त्यामुळे त्यांना होणारा त्रास लक्षात घेता ही सेवा सहजपणे उपलब्ध व्हावी यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयात 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष' सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांचा वेळ व पैशाचा अपव्यय टाळेल. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडून अनेक दुर्धर आजारांवरील उपचारांसाठी येणाऱ्या खर्चाकरीता रुग्णांना संबंधित रुग्णालयामार्फत आर्थिक सहाय्य देण्यात येते. तसेच आपत्ती प्रसंगीही आर्थिक मदत देण्यात येते. या अनुषंगाने मदत मिळविण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामध्ये असंख्य अर्ज प्राप्त होतात. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षामार्फत दुर्धर आणि महागड्या आजारांवरील उपचारांसाठी आर्थिक साहाय्य मिळाल्याने अनेक कुटुंबांना आधार मिळाला आहे. ही मदत मिळविण्यासाठी नागरिकांना राज्याच्या कानाकोपऱ्यातून मंत्रालयात यावे लागते. त्यामुळे नागरिकांचा होणारा त्रास कमी करण्यासाठी आता जिल्हाधिकारी कार्यालयातच 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष' सुरू करण्यात येणार आहे. रुग्णांना त्यांच्या जिल्ह्यातच 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षा'कडे मदतीचा अर्ज करण्याबरोबर, मदतीसाठी पाठपुरावा करणे सोपे होणार आहे. यामुळे नागरिकांचा वेळ व पैशाचा अपव्यय टाळता येईल, अशी माहिती 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षा'चे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी दिली.

### तज्ज्ञ डॉक्टरांची समिती स्थापन

जिल्ह्यातील 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षा'स प्राप्त अर्जांची सद्यस्थिती नागरिकांना उपलब्ध करून देणे व समस्यांचे निराकरण करणे, अर्ज भरण्यास सहाय्य करणे, आर्थिक मदत झालेल्या रुग्णांची रुग्णालयात जाऊन भेट घेणे, जनजागृती आणि प्रसिद्धी करणे, जिल्ह्यातील आपत्तीच्या ठिकाणी भेटी देणे, तसेच अर्थसहाय्य देण्यासाठी आजारांचे पुनर्विलोकन करणे व अर्थसहाय्याची रक्कम नव्याने निर्धारित करणे यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांची समिती स्थापन करण्यात आली आहे. उपचारांचा खर्च दिवसेंदिवस वाढत असून अर्थसहाय्याच्या रकमेचा समितीमार्फत आढावा घेण्यात येणार आहे.

### कारभार कागदविरहित होणार

गरजू रूग्णांना अत्यावश्यक आरोग्यसेवा पुरविण्यासाठी, आर्थिक सहाय्य देण्यासाठी सुरू केलेल्या 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षा'चा कारभार कागदविरहित होणार आहे. त्यामुळे हा निधी मिळविण्याच्या प्रक्रियेसाठी रुग्णांना मंत्रालयात येण्याची आवश्यकता भासणार नाही. यासाठी लवकरच स्वतंत्र ऑनलाइन प्रणाली विकसित करण्यात येणार आहे.

**धर्मादाय** (पान 2 वर..)

# एसटीच्या तिकीट दरात मोठी वाढ

## रिक्षा आणि टॅक्सीचा प्रवासही महागणार

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** एसटी महामंडळाने गेल्या तीन वर्षात एसटीच्या तिकीट दरात कोणतीही वाढ केली नव्हती. मात्र, आता एसटीचा प्रवास महागला आहे. एसटीच्या तिकीट दरात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एसटी महामंडळाने भाडेवाढीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवला आल्याचं काही दिवसांपूर्वी सांगितलं जात होतं. यानंतर अखेर आता एसटीच्या तिकीट दरात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, यासंदभार्तील माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. याबरोबरच रिक्षा आणि टॅक्सीचा प्रवासही महागणार आहे. १ फेब्रुवारीपासून रिक्षा आणि टॅक्सीची देखील भाडेवाढ होणार असल्याची माहिती प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

### प्रताप सरनाईक काय म्हणाले?



'आज मी राज्याच्या प्रधान सचिवांबरोबर चर्चा केली. तेव्हा त्यांनी सांगितलं की गुरुवारी एक महत्वाची बैठक झाली. त्या बैठकीत एसटीच्या भाडेवाढीबाबत निर्णय घेण्यात आला आहे. कारण गेल्या अनेक वर्षांपासून एसटीची भाडेवाढ करण्यात आली नव्हती. आता एसटीची १४.९७ टक्के भाडेवाढ करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तसेच एसटीची ही भाडेवाढ आजपासून लागू करण्यात येणार आहे', अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

### रिक्षा आणि टॅक्सीचा प्रवासही महागणार

'१ फेब्रुवारीपासून रिक्षा आणि टॅक्सीची देखील भाडेवाढ होणार आहे अशी माहिती मला सांगण्यात आली आहे. मात्र, यासंदभार्तील फाईल माझ्यापर्यंत आलेली नाही. पण भाडेवाढीबाबतची फाईल माझ्यापर्यंत येईल. खरं तर एसटीची भाडेवाढ गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. एसटीच्या तिकीट दरात दरवर्षी वाढ करणं गरजेचं असतं. कारण प्रवाशांना सुविधा देत असताना एसटी महामंडळाला खर्चही येतो. यामध्ये डिझेलचा दर दिवसेंदिवस वाढत चालला आहे. तसेच कर्मचाऱ्यांचे पगार वाढले आहेत. यातच एसटी महामंडळाची परिस्थिती आपण पाहिली तर दरदिवशी सुमारे ३ कोटींचा आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. अशा परिस्थितीत भाडेवाढ करण्याशिवाय दुसरा पर्याय नाहीह्व, असं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.

### एसटीची किती टक्के भाडेवाढ होणार?

'एसटीच्या भाडेवाढीसंदभार्तील परिपत्रक आज निघेल. तसचे एसटीची भाडेवाढ ही १४.९७ टक्के करण्यात येणार आहे. तसेच राज्य सरकारने एसटी प्रवासात ज्या सवलती दिलेल्या आहेत त्या सवलती बंद करण्यात येणार नाहीत. त्या सवलती सुरुच राहतील. तसेच महिलांना एसटी तिकीटातून ५० टक्क्यांची सूट देखील सुरु राहणार आहेतह्व, असंही मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितलं.

### रिक्षा आणि टॅक्सीची किती भाडेवाढ होणार?

'रिक्षा आणि टॅक्सीची भाडेवाढ ही ३ रुपये प्रति किलोमीटर होणार आहे. तसेच रिक्षा आणि टॅक्सीची ही भाडेवाढ १ फेब्रुवारीपासून लागू असणार आहे, असंही मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केलं आहे.

# शालेय पोषण आहाराच्या तांदळामध्ये आढळल्या उंदराच्या लेंड्या

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** सांगोला तालुक्यात शालेय पोषण आहार ठेवण्याच्या गोडाऊन मध्ये घुशीचा वावर असून तांदळामध्ये उंदराच्या आणि घुशीच्या लेंड्या आढळून आल्या. हा प्रकार सामाजिक कार्यकर्त्यांनी निदर्शनात आणला.

या नंतर हे गोडाऊन शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी सील केले आहे. शालेय पोषण आहारामधील तांदळामध्ये उंदराच्या व घुशीच्या लेंड्या आढळल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहेत .

सांगोला तालुक्यामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार पुरवठा केला जातो हा आहार ठेवण्यासाठी कमलापूर (ता. सांगोला) येथे गोडाऊन आहे.

या गोडाऊन मधून सर्व शाळांना आहार पाठवला जातो.



पण या गोडाऊनमध्ये उंदरांचा व घुशीचा वावर आहे. तसेच तांदळामध्ये घुशीच्या व उंदराच्या लेंड्या आढळून आल्या. याबाबत सामाजिक

कार्यकर्ते नितिन रणदिवे, दीपक ऐवळे, महेश वाघमारे, प्रवीण वाघमारे, पप्पू आयवळे यांनी हा प्रकार शिक्षण विभागाच्या निदर्शनास आणून दिला. गुरुवारी रात्री उशिरा शिक्षण विभागाचे अधिकारी व अन्नभेसळ अधिकारी यांनी हे गोडाऊन सील केले.

-बापू ठोकळे सामाजिक कार्यकतेर्शालेय पोषण आहारा हा शासनाचा विद्यार्थ्यांसाठी एक चांगला उपक्रम आहे. पण शालेय पोषण आहारामध्ये लेंड्या आढळणे हे धक्कादायक आहे.

संबंधित ठेकेदार व त्याला जबाबदार असणारे अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी, अशी मागणी आम्ही वरिष्ठांकडे केली आहे.

# प्रशासनाने सर्वसामान्यांची कामे सकारात्मक दृष्टिकोन ठेवून त्वरित मार्गी लावावीत - पालकमंत्री गोरे

**सोलापूर, (सचिन जाधव):-** शासनाने सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी विविध योजना सुरू केलेल्या असून त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रशासकीय यंत्रणेची आहे. त्यामुळे या प्रशासकीय यंत्रणेने सर्वसामान्यांबद्दल सकारात्मक दृष्टिकोन ठेवून त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून द्यावा तसेच यंत्रणेकडे येणारी कामे त्वरित मार्गी लावावीत, असे आवाहन ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

नियोजन भवन समितीच्या सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय सर्व विभागांच्या आढावा बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त शितल उगले तेली, आमदार सर्वश्री विजयकुमार देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, समाधान आवताडे,



माजी खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर, माजी आ. सर्वश्री राम सातपुते, रवींद्र राऊत, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे यांच्यासह अन्य संबंधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री गोरे पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शंभर दिवसात सात सुत्री कार्यक्रमाची उद्दिष्टपूर्तता करण्याचे निर्देश दिलेले आहेत त्या अनुषंगाने जिल्हा प्रशासन व सर्व प्रशासकीय यंत्रणेने आपली जबाबदारी ओळखून कामे पूर्ण करावीत. या अंतर्गत सर्वसामान्यांना विविध सोयी सुविधा देण्याबरोबरच कार्यालयाची स्वच्छता करावी. तसेच ही स्वच्छता मोहीम राबवत असताना सर्वसामान्य नागरिकांना चांगली वागणूक देऊन त्यांची कामे त्वरित मार्गी लावण्याच्या दृष्टीने अधिकारी-कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या मनाची स्वच्छता ही केली पाहिजे, असे निर्देश त्यांनी दिले.

जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयात येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना त्या त्या कार्यालयातील अधिकारी कर्मचारी कशा पद्धतीची वागणूक देतात याची माहिती मिळण्यासाठी सर्व शासकीय कार्यालयात व्हाईस सीसीटीव्ही कॅमेरे यंत्रणा बसवावी, त्यासाठी आवश्यक असलेला निधी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून उपलब्ध करण्यात येईल. तसेच कार्यालयात येणाऱ्या नागरिकांची कशा पद्धतीने वागावे याबाबत सर्व अधिकारी कर्मचारी यांना प्रशिक्षण द्यावे. प्रत्येक कार्यालयात स्वच्छता कशा पद्धतीने ठेवली जात आहे तसेच सर्वसामान्य नागरिकांची त्या कार्यालयांचा व्यवहार कशा पद्धतीचा आहे याची माहिती आपण त्या त्या शासकीय कार्यालयात पुढील काळात अचानक भेट देऊन माहिती घेणार असल्याचे पालकमंत्री श्री. गोरे यांनी सांगितले.

केंद्र व राज्य शासन हे दूरदृष्टी असलेले शासन असून सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व प्रकारचे सहकार्य मिळणार आहे. पुढील काळात सोलापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर उद्योग व्यवसाय वाढतील यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत तसेच येथे येणाऱ्या गुंतवणूकदारांना गुंतवणूक करताना कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही यासाठी प्रशासनाने ही योग्य ती खबरदारी घ्यावी. तसेच प्रशासकीय यंत्रणेने लोकप्रतिनिधी यांच्या सहकायार्तून सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवावेत. तसेच लोकप्रतिनिधी घेऊन आलेले प्रश्न, कामे विहित पद्धतीने पूर्ण करावीत. लोकप्रतिनिधी यांना सन्मान द्यावा असेही पालकमंत्री गोरे यांनी सुचित केले.

सोलापूर शहराला पाणीपुरवठा करणारी सोलापूर (पान 2 वर..)

## संपादकीय

# ढीग खटल्यांचा की न्यायाचा?

कमलेश गिरीदेशात 5 कोटी 8 लाख 85 हजार 856 अधिक खटल्यांमधील वादी आणि प्रतिवादी न्यायाच्या प्रतिक्षेत आहेत, यावरून न्यायालयांमध्ये प्रलंबित खटल्यांचा ढिगारा किती आहे, हे लक्षात येते. देशातील न्यायालयांमध्ये वषार्नुवर्षापासून प्रलंबित असणाऱ्या खटल्यांचा विषय अनेकदा चर्चिला गेला आहे. खटल्यांचे ओझे कमी करण्यासाठी आपली न्यायालये सातत्याने प्रयत्न करत आहेत. यासाठी प्रणालीमध्ये अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत. जुन्या प्रलंबित प्रकरणांच्या पहिल्या सुनावणीवर भर दिला जात आहे. तसेच तारीख पे तारीख ही परंपराही खंडित करण्यासाठी प्रयत्न होत आहे.

न्यायालयीन प्रणाली अधिक पारदर्शक आणि तंत्रज्ञानस्नेही केली जात आहे. खटल्यांचे जलद निराकरण करण्यावर भर दिला जात आहे. पण लाखो प्रयत्न करूनही खटल्यांचा ढीग कमी होत नाहीये, ही वस्तुस्थिती आहे. 1 लाख 80 हजार प्रकरणे 30 वर्षांहून अधिक काळ प्रलंबित आहेत. देशातील सर्वात मोठ्या न्यायमंदिरात 80 हजारांहून अधिक प्रकरणे प्रलंबित आहेत. ढोबळ अंदाजानुसार 85 टक्क्यांहून अधिक प्रकरणे जिल्हा न्यायालयांमध्ये प्रलंबित आहेत. यातील सुमारे 25 टक्के प्रकरणे महसुलाशी संबंधित आहेत. याखेरीज वाहतुकीचे नियम न पाळल्याबद्दल दाखल झालेल्या गुन्हयांची प्रकरणे मोठ्या प्रमाणात आहेत. त्यावर तोडगा काढण्याचे मार्ग निघू लागले आहेत.

याखेरीज देशात वेळोवेळी होणाऱ्या लोकअदालतींमध्ये मोठ्या प्रमाणात प्रकरणे निकाली निघू लागली आहेत. पण जलदगती न्यायालयांसह विशेष न्यायालये निर्माण होऊनही त्यांची संख्या कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस वाढतच आहे. काही महिन्यांपूर्वी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनीही रेंगाळलेल्या खटल्यांबाबत चिंता व्यक्त केली होती. अलीकडेच यासंदभार्तील माहिती देताना केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन मेघवाल यांनी एक धक्कादायक वास्तव मांडले. त्यानुसार, देशातील न्यायालयांमधील 45 लाखांहून अधिक खटले हे केवळ चेक बाउन्सशी संबंधित आहेत. न्यायालयांमध्ये प्रलंबित प्रकरणांपैकी 9 टक्के प्रकरणे ही एकट्या चेक बाउन्सची आहेत. यामध्ये राजस्थानमध्ये सर्वाधिक 6 लाखांहून अधिक प्रकरणे विचाराधीन आहेत, तर महाराष्ट्र, गुजरात, दिल्ली आणि उत्तर प्रदेश या चार राज्यांमध्ये चेक बाउन्सची सर्वाधिक प्रकरणे विचाराधीन आहेत. चेक बाउन्ससारखी प्रकरणे निकाली काढण्याचा मार्ग शोधला तर न्यायालयातील खटल्यांचा ढीग नक्कीच कमी होऊ शकतो. किरकोळ हल्ले व इतर तत्सम किरकोळ प्रकरणांसंदर्भातील खटले न्यायालयांवर सतत ओझे बनत आहेत. लवादाची तरतूद असूनही अनेक प्रकरणे निकाली निघत नाहीत. जमीन, मालमत्ता आणि फौजदारी प्रकरणे न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करून जलदगतीने निकाली काढणे आवश्यक आहे. चेक बाउन्सच्या प्रकरणांचा विचार करता यात दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. चेक बाऊन्स झाल्यास 2 वर्षांचा कारावास किंवा चेकच्या दुप्पट रक्कम भरण्याची तरतूद आहे. खटल्याच्या स्वरूपानुसार शिक्षा कमी-अधिक असू शकते. चेक बाउन्सची ही प्रकरणे निकाली काढण्यासाठी विशेष मोहीम राबवणे, लोकअदालत बसवणे, दोन्ही पक्षकारांना बोलावून चर्चा करून तोडगा काढणे किंवा तत्सम तोडगा काढणे हा उत्तम मार्ग आहे. अशा वेळी एक किंवा दोनपेक्षा जास्त तारखा दिल्या जाऊ नयेत. अशी प्रकरणे न्यायालयात येताच, दोन्ही पक्षकारांना त्यांची बाजू पहिल्या किंवा दुसऱ्या तारखेला मांडण्याची संधी देऊन त्यांचा निपटारा करणे अधिक योग्य ठरेल. न्यायसंस्थेशी निगडित तज्ज्ञ अभ्यासकांनी न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करून अशा समस्या सोडवण्यासाठी काही सकारात्मक सूचना देण्याबाबत पुढाकार घेण्याची गरज आहे. तसेच या सूचनांचा साकल्याने विचार करून सरकार आणि न्यायव्यवस्थेने चाचपणी करून तद्नुरूप व्यवस्था केली तर खटल्यांचा ढीग कमी होऊ शकतो. चेक बाउन्सच्या खटल्यांमध्ये जास्त कायदेशीर गुंतागुंत नसलेली प्रकरणे लवकर निकाली काढण्याचा मार्ग शोधून न्यायालयांवरील भार हलका केला गेला पाहिजे. ग्राहक न्यायालये, किशोरवयीन मुलांसंबंधीचे खटले चालविणारी न्यायालये आणि कौटुंबिक न्यायालये ही न्यायप्रणालीवरील प्रलंबित खटल्यांचा बोजा कमी व्हावा याच हेतूने स्थापन केली गेली होती, जेणेकरून अशा प्रकारचे खटले लवकरात लवकर निकाली निघावेत. परंतु या न्यायालयांची उपयुक्तता अद्यापही सिद्ध होऊ शकलेली नाही. वकिलांकडून दरवेळी पुढील तारखा मागून घेऊन सुनावणी टाळण्याकडेच कल दिसून येत असल्यामुळे अशा विशेष न्यायालयांच्या स्थापनेचा उद्देश सफल होत नाहीये. प्रलंबित खटल्यांचा प्रश्न तपास यंत्रणांशी आणि त्यांच्या कार्यपद्धतीशीही संबंधित आहे. उदाहरणच घ्यायचे झाल्यास, आजघडीला सेंट्रल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन अर्थात सीबीआयकडे तपास असलेल्या 6900हून अधिक प्रकरणांचे खटले विविध न्यायालयांत प्रलंबित आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, यातील 320 खटल्यांचा 20 वर्षांहून जास्त काळ लोटला, पण अद्याप निकाल लागलेला नाही. केंद्रीय दक्षता आयोगाच्या ताज्या वार्षिक अहवालातून ही बाब पुढे आली आहे. वस्तुतः गुन्हयाची नोंद झाल्यानंतर एका वर्षात सीबीआयने त्या प्रकरणाचा तपास पूर्ण करणे आणि तपास पूर्ण झाल्यानंतर संबंधित न्यायालयात तपास यंत्रणेने आरोपपत्र दाखल करणे अपेक्षित आहे. परंतु सीबीआयकडून ही अपेक्षा पूर्ण होत नाही. अशा वेळी उर्वरित तपास यंत्रणांची स्थिती विचारातच न घेतलेली बरी! प्रलंबित खटल्यांचा निपटारा करण्यासाठी मनुष्यबळ पुरेसे नसणे हेही महत्त्वाचे कारण आहे. विशेषतः न्यायाधीशांच्या रिक्तपदांचा मुद्दा याबाबत नेहमीच चर्चिला जातो. केंद्र सरकारने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार देशभरातील जिल्हा न्यायालयांमध्ये मंजूर पदांची संख्या 25 हजार 423 असून न्यायाधीशांची संख्या 20 हजार 26 आहे. म्हणजेच पाच हजारांहून अधिक पदे रिक्त आहेत. देशातील सर्व 25 उच्च न्यायालयांमध्ये न्यायाधीशांची 1122 मंजूर पदे आहेत, परंतु अद्याप 350 हून अधिक पदे रिक्त आहेत. एकट्या अलाहाबाद उच्च न्यायालयात 60 हून अधिक पदे रिक्त आहेत. लोकसंख्येचा विचार केला तर सध्या दर 7.10 लाख लोकसंख्येमागे एक न्यायाधीश कनिष्ठ न्यायालयात कार्यरत आहेत. युनायटेड स्टेट्स सेन्सस ब्युरोनुसार, भारताची एकूण लोकसंख्या 1 अब्ज 42 कोटींहून अधिक आहे. त्यानुसार 7 लाख लोक कनिष्ठ न्यायालयाच्या एका न्यायाधीशावर अवलंबून आहेत. मात्र, सरकारचे म्हणणे आहे की दर 10 लाख लोकांमागे एकूण 21 न्यायाधीश आहेत. सरकारचा हा आकडा उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय आणि कनिष्ठ न्यायालयातील सर्व न्यायाधीशांची संख्या एकत्रित करून दिलेला आहे.

# राष्ट्रीय मतदार दिन

स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन हे दोन आपले राष्ट्रीय सण आहेत हे आपणा सर्वांना माहीतच आहे या दिवशी देशभक्ती ओसंडून वाहत असते पण या दिवसा इतकाच आजचा दिवसही तितकाच म्हत्वाचा आहे हे अनेक लोकांना माहीत नाही. आज २५ जानेवारी आज राष्ट्रीय मतदार दिन.आजच्याच दिवशी भारतीय लोकशाहीचा पाया रचला गेला. आजच्याच दिवशी म्हणजे २५ जानेवारी १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची स्थापना झाली म्हणून हा दिवस संपूर्ण देशात राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो. भारतीय लोकशाहीने प्रत्येक सुजाण नागरिकाला मतदानाचा मूलभूत हक्क बहाल केला आहे. त्यामुळे मतदार यादीत नाव नोंदवून प्रत्येक नागरिकांनी निवडणुकीत आपले मतदान नोंदवून लोकशाही बळकट करावी असा उद्देश या दिवसामागे आहे. म्हणून या दिवशी भारत निवडणूक आयोग विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन मतदानासंदर्भात जनजागृती करते. या दिवशी १८ वर्ष पूर्ण झालेल्या नवीन मतदारांची नोंद करून त्यांना भारत निवडणूक आयोगाचे ओळखपत्र दिले जाते. मतदान हे प्रत्येक सुजाण नागरिकांचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. १८ वर्ष पूर्ण झालेल्या प्रत्येक नागरिकांना संविधानाच्या अनुच्छेद ३२६ नुसार मतदानाचा हक्क दिला आहे. मतदान करणे ही देखील देशसेवाच आहे. त्यामुळे जास्तीतजास्त लोकांनी मतदान करुन भारतीय लोकशाहीला बळकट करायला हवे मात्र आपल्या देशात आजही मतदार मतदानाबाबत गंभीर आहेत असे दिसत नाही. घटनाकारांनी मतदानाचा अधिकार बहाल करून देशवासियांना खूप मोठे अस्त्र दिले आहे पण दुदैर्वाने आजही लोकांना त्याचे महत्व नाही म्हणूनच आपल्या देशात कोणत्याही निवडणुकीत ६० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान होत नाही याचाच अर्थ देशातील ४० टक्के मतदार मतदान करित नाहीत. भारतीय मतदारांचा मतदानाबाबतचा हा निरुत्साह लोकशाहीला मारक आहे. विशेष म्हणजे सुशिक्षित वर्गातच मतदानाविषयी निरुत्साह दिसून येतो. मतदानादिवशी राष्ट्रीय सुट्टी असते या दिवशी मतदान करण्याऐवजी सहकुटुंब सहलीला जाण्याचा ट्रेंड सुशिक्षित वर्गात दिसून येतो आपण एकट्याने मतदान केले नाही तर काय फरक पडणार असाच आविर्भाव या लोकांमध्ये दिसून येतो. जे मतदान करतात त्यातील काही लोक मतदान करण्याऐवजी आपल्या मताची विक्री करतात. रोटी, बोटी, आणि चपटीसाठी काही जण आपले मत अक्षरशः विकतात. अर्थात सर्वचजण असे करतात असे नाही. बहुतेक जण विचार करुन आपल्या देशासाठी, समाजासाठी योग्य अशा उमेदवाराला मतदान करतात हे ही नाकारून चालणार नाही अशा लोकांची संख्या वाढली पाहिजे. लक्ष्मी दर्शन झाल्यानंतरच मतदान करणारे लोक बाबासाहेबांनी दिलेल्या या अस्त्राचा दुरुपयोग करतात. या लोकांमुळेच लोकशाही कलंकित होत आहे. बाबासाहेबांनी हे अस्त्र आपल्या हाती देण्यासाठी किती कष्ट सोसले याचीही जाणीव या लोकांना नाही. संविधानात मतदानाचा मूलभूत हक्क समाविष्ट करून बाबासाहेबांनी आपल्याला सर्वात मोठा हक्क मिळवून दिला आहे. आपलव हा मतदानाचा पवित्र हक्क बजावून प्रत्येकाने लोकशाही बळकट करायला हवी. प्रत्येकाने मतदानाचा हक्क जबाबदारीने बाजावल्यास देशाचे भविष्य बदलू शकते. त्यामुळे प्रत्येकाने निराशावादी भूमिका सोडून जागरूकतेने व स्वयंस्फूतीर्ने प्रत्येक निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावून राष्ट्रीय कार्यामध्ये आपला खारीचा वाटा उचलायला हवा. लोकशाहीचे बळकटीकरण करावयाचे असेल तर जागरुक मतदारांचा एक मोठा वर्ग अस्तित्वात येणे आवश्यक आहे. त्यामुळे आपला देश विकसनशीलतेकडून विकसित देश होण्याकडे निश्चितच मदत होईल. १८ वर्षांपुढील सर्व सुजाण नागरिकांनी आगामी निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावला तरच राष्ट्रीय मतदार दिन साजरा केल्याचे सार्थक होईल.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## गहिवरलेल्या वातावरणात जुन्या आठवणींना उजाळा देत महेश कोठे यांना वाहण्यात आली श्रध्दांजली

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** गहिवरलेल्या वातावरणात जुन्या आठवणींना उजाळा देत साश्रू नयनांनी सोलापूरकरांनी माजी महापौर महेश कोठे यांना श्रद्धांजली वाहिली. जुना विडी घरकुल येथील संभाजीराव शिंदे प्रशालेत शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री सिद्धारूढ सांस्कृतिक भजनी मंडळाचे लक्ष्मण देविदास आणि सहकाऱ्यांनी भजन सादर केले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते सुधीर खरटमल म्हणाले, माजी महापौर महेश कोठे आणि माझी अनेक दशकांपासूनची मैत्री होती. ते अत्यंत धाडसी व्यक्तिमत्व होते. नुकत्याच झालेल्या निवडणुकीतही पूर्वी बायपास सर्जरी झाल्यामुळे अधिक पदयात्रा करू नका असा आम्ही आग्रह करून देखील त्यांनी नागरिकांशी संपर्क तोडला नाही.माजी महापौर ॲड. यू.एन.



बेरिया म्हणाले,शहरात आयटी पार्क, विधी महाविद्यालयाचे स्वप्न त्यांनी पाहिले. गरिबांची मनापासून काळजी करणारे नेते अशी त्यांची ओळख होती.प्रा. अशोक निंबर्गी म्हणाले, महेश कोठे हे दातृत्व असलेले नेतृत्व होते. महानगरपालिकेचे अनभिषिक्त सम्राट होते.शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे म्हणाले,माजी महापौर महेश कोठे यांनी अनेक कार्यकर्ते घडवले. अनेकांना संधी दिली. माणसे पारखली. छत्रपती श्री संभाजी महाराजांची मूर्ती सोलापुरात उभी करण्याचे श्रेय माजी महापौर महेश कोठे यांना जाते.

ते अष्टपैलू व्यक्तिमत्व होते. याप्रसंगी सुरेश पाटील, संजय हेमगड्डी, आनंद चंदनशिवे, ॲड. श्रीनिवास क्यातम, सिध्दाराम चाकोते, महेश गादेकर, मधुकर आठवले,प्रा. अजय दासरी, सुरेश फलमारी, सुधीर बहिरवाडे, अशोक इंदापुरे, युसुफ मेजर, नागेश वल्याळ आदींनीही श्रद्धांजली वाहिली. गुरुशांत धुत्तरगांवकर यांनी सूत्रसंचालन केले.

## प्रशासनाने सर्वसामान्यांची..

शहर वाढीव पाणीपुरवठा योजना ही खूप मोठी योजना असून या योजनेचे 90% पेक्षा अधिक काम झालेले दिसून येत आहे. तरी पाणी पंपिंग करण्यासाठी लागणारी वीज ही सौर ऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून उपलब्ध करण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करू. हा सौर ऊर्जा प्रकल्प झाल्यास महापालिकेचे दरमहा लाखो रुपयांची वीज बचत होऊन हा निधी विकास

कामांना वापरणे शक्य होणार असल्याचे पालकमंत्री श्री. गोरे यांनी सांगितले. तसेच जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद, महापालिका व अन्य संबंधित विभागाचे विकास कामासाठी शासन स्तरावर प्रलंबित असलेले सर्व प्रश्नांची सोडवणूक सर्वांच्या सहकायार्तून लवकरात लवकर करण्यास आपले प्राधान्य राहील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सादरीकरणाद्वारे सोलापूर जिल्ह्याची सर्वसाधारण माहिती सांगितली.

तसेच जिल्हा प्रशासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेले विविध योजना प्रकल्प याची माहिती दिली. त्याप्रमाणेच मुख्यमंत्री महोदयांचा शंभर दिवसात उद्दिष्ट पूर्तता कार्यक्रम याची सविस्तर माहिती दिली. सोलापूर विमानतळ विषय सविस्तर माहिती देऊन माहे मार्च 2025 मध्ये येथून प्रवासी विमान वाहतूक सुरू होऊ शकते असे त्यांनी सांगितले. महापालिका आयुक्त श्रीमती तेली यांनी सोलापूर महापालिकेची सविस्तर माहिती दिली. तर मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी जिल्हा परिषदेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती बैठकीत दिली.

शहरातील राष्ट्रपुरुषांच्या पुतळ्यांना पालकमंत्री यांनी केले वंदन-

राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे हे पालकमंत्री म्हणून नियुक्ती झाल्यानंतर प्रथमच सोलापूर जिल्हा दौऱ्यावर आले असताना सोलापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, धर्मवीर संभाजी महाराज पुतळा, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुतळा, चार हुतात्मा पुतळा येथे जाऊन त्यांना पुष्पहार अर्पण करून वंदन केले.

## सोलापूर विमानतळावरुन...

1. सोलापूर विमानतळाला नेमका कोणता परवाना (उदा. एरोड्रम परवाना, ऑपरेशनल रेडीनेस परवाना) मंजूर करण्यात आला आहे? त्याची तारीख आणि प्रती मिळावी.

2. DGCA ने सोलापूर विमानतळ प्राधिकरणाला कोणत्या सूचना दिल्या आहेत? त्या पूर्ण करण्यासाठी घेतलेल्या उपाययोजनांची माहिती मिळावी.

3. उड्डाण सेवेला विलंब होण्याची प्रमुख कारणे कोणती? कोणती प्रलंबित मंजुरी किंवा अडचणी आहेत?

4. उड्डाण सेवा सुरु होण्याचा संभाव्य कालावधी जाहीर करावा.

सोलापूर विमानतळ सुरू होण्यामुळे केवळ प्रवासी सोयीसुविधाच नाही तर येथील औद्योगिक आणि आर्थिक प्रगतीलाही गती मिळणार आहे. DGCA ने तत्काळ पावले उचलून उड्डाण सेवेसाठी अडथळे दूर करावेत अशी नागरिकांची मागणी आहे.

सोलापूर विमानतळाच्या प्रगतीसाठी सोलापूर विकास मंचाने केलेल्या अथक प्रयत्नांमुळे सोलापूरकरांचे स्वप्न सत्यात येण्याच्या मार्गावर आहे. DGCA कडून यावर लवकरात लवकर सकारात्मक उत्तर मिळेल अशी अपेक्षा आहे. विमानतळाचे कार्यान्वयन थांबवणे सोलापूरच्या विकासासाठी मोठा धक्का ठरू शकतो. DGCA कडून लवकरात लवकर ठोस निर्णय होऊन सोलापूरकरांचे स्वप्न पूर्ण व्हावे अशी सर्वांची आशा आहे.

## प्रबोधन

# सरळ बोलावे । सरळ वागावे

एका खंडप्राय देशाचं राजकारण सांभाळूवडीपाय जकारणी नसलेली व्यक्ती कोण? ओळखा पाहू! या सदरातील हा प्रश्न अनेकांना सकृतदर्शनी खूप सोपा वाटेल. पण त्यांच्या मनात अनेक शंकाही निर्माण करील. सन १९२० ते १९४७ पर्यंतचं भारताचं राजकारण केलं महात्मा गांधीजींनी. पण तरीही ते साबरमतीचे संतच होते; राजकारणी नव्हते. एका बाजूला जुलमी ब्रिटिश सत्ता होती, दुसऱ्या बाजूला अहिंसेच्या राजकारणाला कस्पटाप्रमाणे मानणारे सुभाषचंद्र बोस, भगतसिंग, आणि सावरकरांसारखे युद्धप्रेमी स्वदेशी नेते होते आणि तिसऱ्या बाजूला आपल्या ज्ञातिबांधवांच्या हितसंबंधांना जपणारे डॉ. आंबेडकर, बॅ. जिना आणि गोळवलकरांसारखे ज्ञातीनिष्ठ समाजनेते होते. अशा राजकीय युद्धभूमीवरील तीन- तीन आघाड्यांवर प्राणपणाने जपलेली आपली नैतिक मूल्यं न सोडता लढून यशस्वी होणाऱ्या व्यक्तीला राजनीतिज्ञांचे मुकुटमणीही म्हणायला हवं, थोर नीतिमान पुरुषश्रेष्ठही म्हणायला हवं !

आपल्या कामातील जागतिक कीतीर्चे अव्वल राजकारणी असूनही महात्मा गांधी हे वरून राजकारणी होते, पण आतून थोर मानवतावादी संतश्रेष्ठ होते. संत चोखामेळा हे, आतून कोण कसा आहे ते पाहायला सांगतात- ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा। काय भुललासी वरलिया रंगा ॥ असं त्यांचं म्हणणं आहे. महात्माजी हे आतून पक्के वैष्णवजन होते. परपीडा हे त्यांच्या लेखी पाप होतं. म्हणून चले जाव, करेंगे या मरेंगे असं ते म्हणाले. पण त्यांच्या घोषणेत मारेंगे असा शब्द नव्हता. त्यांनी आपला संतपणा, सज्जनपणा, मानवताप्रेम अबाधित ठेवलं. गांधीजींनी अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, असंग्रह, शरीरश्रम, अस्वाद, सर्वत्र भयवर्जन, सर्वधर्मी समानत्व, स्वदेशी, स्पर्शभावना, दया, क्षमा, शांती या गुणसमुच्चयावरून आपलं चित्त क्षणभरही कधी विचलित होऊ दिलं नाही. म्हणून फक्त त्यांच्याच राजकारणाला राजनीती हा शब्द योग्य आहे. सर्वच राजकारण हे राजनीती या सदरात बसत नाही.

'आत्म्याचा आवाज सतत खरा असतो,' असं विचारवंत इमर्सन म्हणतात, आणि गांधीजींनी तर आपला आतला आवाज सदोदित ऐकूनच त्यानुसार वर्तन केलं. आत्मा अर्थात आपलं मन, आपली सद्सद्विवेकबुद्धी काय म्हणते, आपण जे करतो ते तिला मान्य होतं की नाही, हे जो नेहमी पाहातो तोच मनुष्य नीतिमान असू शकतो. गांधीजींनी चौरीचुरा येथील सत्याग्रहींनी पोलिसांसह चौकी जाळण्याच्या घटनेला आपली डोंगराएवढी चूक मानून मनःशुद्धीसाठी एकवीस दिवसांचं उपोषण केलं. सत्याग्रहींना अहिंसक सत्याग्रहाचा अर्थ तेव्हा नीट कळला आणि त्यांचं राजकारण राजनीतीमध्ये परिवर्तित झालं. हृदयपरिवर्तनाचाच हा एक प्रकार होता.

आजच्या गलिच्छ राजकारणाला कुणी राजनीती म्हणत असेल, तर ते 'नीती' या पवित्र शब्दाचं अवमूल्यन आहे. लुबाडण्याच्या धंद्याला अर्थनीती, घात करण्याला कपटनीती, धूर्तवर्तनाला धूर्तनीती, कारस्थानीपणाला कृष्णनीती, कंजूषपणाला कृपणनीती, अशा शब्द प्रयोगात अंशमात्र तरी नीती शिल्लक असते काय? नीती या शब्दाचा अर्थलोप दर्शवणारं भाषेचं हे आडवळण सरळमार्गी लोक कधीही मान्य करणार नाहीत.

जीवनात सत्ता आणि संपत्ती प्राप्त करण्याला व्यवहारनीती म्हटलं जातं; पण नीतिमान माणसं सफलतेच्या पहिल्या पायरीपर्यंतच फार तर जातात. पुढच्या पायऱ्या अनीतीने बरबटलेल्या पाहून त्यांवर ते आपले स्वच्छ पाय ठेवीत नाहीत. भौतिक सुखांची सर्वोच्च पायरी नीती सोडल्याशिवाय गाठता येत नाही. म्हणून तर जॉर्ज बर्नार्ड शॉ म्हणतात, 'सफलतेच्या पोटात अनेक गफलती दडलेल्या असतात.' कादंबरीकार डोस्टोव्हस्कींनी, 'धनिकांची सुखसदने पापाच्या काळ्याकुट्ट पायांवरच उभी असतात,' असं स्पष्टपणे जाहीरच केलं आहे. व्यवहारगुरू तर साम, दाम, दंड, भेद या चार प्रकारांना नीती असंच नाव निर्लज्जपणे देऊन मोकळे होतात. हे चारही मार्ग सफलतेकडे जातात, पण ते सज्जनांना वर्ज्य आहेत. गौतम बुद्धांनी राजवाड्याबाहेर पडल्यावर पुन्हा कधी राजवाड्यात पाऊल टाकलं नाही. छत्रपती शाहू तर सतत आकाशाच्या छताखालीच विसावलेले असायचे. गर्भश्रीमंतीत वाढलेले गांधीजी सेवाग्रामला झोपडीत राहू लागले. वैभवाचा तिटकारा महापुरुषांना सतत येतो. कारण ते शोषणजन्य, पापजन्य, अनीतिजन्य, असते आणि अशा वैभवाच्या छायेत आपण मोकळा श्वास घेऊ शकणार नाही, असं त्यांना वाटत असतं. तात्पर्य, मानवी गैरव्यवहारासाठी नीती शब्दाचा दुरुपयोग होणे, हे समाजजीवनाचं अपयश असलं तरी, 'उडदामाजी काळेगोरे काय निवडावे निवडणारे।' असा निराशेचा सूर विचारवंतांनी तरी काढू नये. किमानपक्षी त्यांनी भाषिक शुद्धता तरी जिवापाड जपावी!

भाषेने न व्हावे । भावप्रदूषण
संकट महान । संवादास ॥१
लोकांचे वळण । आकलना पार
बोलण्याचा घोर। सज्जनास ॥२
गुंडांना भिऊन । नाव देती दादा
जगण्याचा वांधा। टाळण्यास ॥३
भाषेची त्यामुळे। होतसे विकृती
भोळ्यांची फजिती। हमखास ॥४
सरळपणाचे । होते नुकसान
भाषेचे वळण । बिघडते ॥५
वक्रोक्ती, व्यंग्योक्ती । नव्हे अलंकार
उपहास तर। नीचपणा ॥६
सरळ बोलावे । सरळ वागावे
समाजात व्हावे। रूढ तेच ॥७
भाषेने धारणा व्हावी समाजाची
ठिणगी तंट्याची। पडू नये ॥८



प्रा. डॉ. जे. बी. शिंदे
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

## राजराजेश्वरी प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विनायक नगर येथील राजराजेश्वरी बालक मंदिर प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन हुतात्मा स्मृती मंदिर येथे उत्साहात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अध्यक्ष अण्णाराव कुंभार होते. प्रमुख अतिथी दी आर्ट ऑफ लिव्हिंग देव गोसकी, अनुपमा गोसकी यांच्या हस्ते संमेलनाचे उदघाटन करण्यात आले. यावेळी माता-पालक संघाचे सदस्य शितल पवार, प्रेमा कुंभार, पालक शिक्षक संघाचे सदस्य ज्योतिबा खट्याळ संस्थेच्या खजिनदार ललिता कुंभार, सेवानिवृत्त मुख्याध्यापक विजयकुमार हुल्ले,नेताजी प्रशालेचे मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, माध्यमिक प्रशालेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे, संगीत विद्यालयाचे संचालक विश्वाराध्य मठपती, नेताजी प्राथमिक शाळेच्या



मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार आदी मान्यवर उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली कुंभार यांनी प्रास्ताविकेतून शाळेचे अहवाल वाचन केले.

त्यानंतर पी.पी.टी.द्वारे शाळेत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दाखवण्यात आले. स्नेहसंमेलनात जगाला तुज्या रूपाचा, डान्स का भूत, अंगारू का अंबर सा, नाना नानी दादा दादी, श्रीराम गाणे, तारक मेहता का उल्टा चश्मा, आरंभ है प्रचंड, नेताजी, पिचली माझी बांगडी, धनगर वाड्यात, सणांची ओळख, शिवरायांचा इतिहास, ढोलीडा ढोल बाजे, बम भोले बम, कराटे प्रात्यक्षिक आदी विविध गाण्यावर नृत्य सादर केले. स्नेहसंमेलनात बालवाडी ते सातवीपर्यंतच्या ३३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केदार कुंभार यांनी केले.सांस्कृतिक कार्यक्रमाचे निवेदन सुजाता फुलारी व उज्ज्वला भांड यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी वृंदानी परिश्रम घेतले.

## राष्ट्रध्वजासाठी प्लॅस्टिकचा वापर करु नये- प्रांताधिकारी सचिन इथापे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** केंद्र शासनाच्या गृहमंत्रालयाने दिलेल्या निदेर्शानुसार राष्ट्रध्वजाकरीता प्लॅस्टिकच्या वापरास तसेच प्लॅस्टिकचा राष्ट्रध्वज निर्मितीस व विक्रीस मान्यता नाही. राष्ट्रध्वजाचा मान राखणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असून, राष्ट्रध्वजाचा योग्य तो मान राखला जावा तसेच त्याचा अवमान होऊ नये, यासाठी प्लॅस्टिकच्या राष्ट्रध्वजाचा वापर, निर्मिती व विक्री करू नये, असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

दरवर्षी प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन, स्वातंत्र्य दिन, इतर राष्ट्रीय कार्यक्रम व महत्त्वाचे सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा सामन्यांच्या वेळी विद्यार्थी व नागरिकांकडून राष्ट्रध्वजाचा वापर करण्यात येतो. हा कार्यक्रम पार पडल्यानंतर फाटलेले कागदी तसेच प्लॅस्टिकचे राष्ट्रध्वज मैदानात, रस्त्यावर तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी इतस्ततः पडलेले असतात. असे राष्ट्रध्वज पायदळी तुडविले जातात. त्यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान होतो. राष्ट्रध्वजाचा अवमान करणे त्याची विटंबना होणे हे बोधचिन्हे नावे (अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम १९५० राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१ तसेच ध्वजसंहितेच्या तरतुदीनुसार दंडनीय अपराध आहे.

### वात्रटिका

**मोनालिसा**

प्रयागराज मध्ये भरला
फार वर्षांनी महाकुंभ मेळा...
सगळ्यांना वेड लागले
मोनालिसा वर त्यांचा डोळा...
तिचं रूप तिचं डोळं बघून
लोकांना भुरळ पडली...
नशिबाने दार ठोठावले नि
तिला बॉलिवूडची दारे उघडली...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

पान १ वरून

## जिल्हाधिकारी कार्यालयातही...

**रुग्णालय मदत कक्षाला जोडणार**

रुग्णांना अधिक सोयीस्कर सेवा उपलब्ध करून देण्यासाठी धमार्दाय रुग्णालय मदत कक्ष ऑनलाईन प्रणाली आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष ऑनलाईन प्रणाली (सीएमआरएफ पोर्टल) जोडण्यात येणार आहे. सध्याच्या प्रचलित कार्यपद्धतीप्रमाणे रुग्णाला दिला जाणारा एओ क्रमांक आणि एम क्रमांक एकत्र करण्यात येणार आहे.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# नॉलेजसिटी येथे नेताजी सुभाष चंद्र बोस जयंती साजरी



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, शंकरनगर, अकलूज येथे आज २३ जानेवारी २०२५ रोजी नेताजी सुभाष चंद्र बोस यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात बीबीए विद्यार्थ्यांसह प्रमुख उपस्थित म्हणून प्र.प्राचार्य साठे. बी. एम., प्रा.कंगळे . एन. आर., प्रा . सय्यद. व्ही. एच. आणि ठरर कार्यक्रम अधिकारी धाइंजे एस. आर. हे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी नेताजी यांच्या योगदानावर एक विचारमंथन सत्र आयोजित केले. कार्यक्रमात नेताजींच्या आयुष्याची आणि त्यांच्या भारत स्वतंत्रतेसाठी केलेल्या प्रयत्नांची महती विद्यार्थ्यांना सांगण्यात आली. विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, भाषण आणि निबंध स्पर्धेद्वारे नेताजींच्या कार्यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे वसंतराव काळे प्रशाला व जुनिअर कॉलेचेचे प्राचार्य दादासाहेब खरात उपस्थित होते. त्यानी सुभाषचंद्र बोस यांचे देशप्रेम यावरती माहिती दिली. तसेच कॉलेजचे प्र .प्राचार्य साठे. बी. एम. यांनी विद्यार्थ्यांना नेताजींच्या कायार्ची प्रेरणा घेऊन देशाच्या सेवा करण्याचे महत्त्व सांगितले. तसेच प्राध्यापक कांगळे एन. आर. आणि सय्यद. व्ही. एच. यांनी नेताजींच्या धैर्य, स्वाभिमान आणि नेतृत्वावर प्रकाश टाकला. ठरर कार्यक्रम अधिकारी धाइंजे एस. आर. यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवेला महत्त्व दिले आणि समाज कार्यात सहभागी होण्याचे आवाहन केले. तसेच कॉलेज चे शिक्षकेत्तर कर्मचारी घोंगडे एच .ए , एकतपुरे . टी . के व शिपाई खांडागळे .एं व्ही आणि फलटणकर . ए. एम उपस्थित होते .कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्वांना नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या कायार्ची महत्त्वपूर्ण शिकवण देण्यात आली आणि कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रध्वजाच्या शपथ घेऊन केला. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांनी मिळून काम केले.

# शासकीय ध्वजारोहण समारंभाचे आयोजन

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या 75 व्या वर्धापन दिनानिमित्त शासकीय ध्वजारोहण समारंभ रविवार दिनांक 26 जानेवारी 2025 रोजी सकाळी 09.15 वाजता रेल्वे मैदान, पंढरपूर येथे होणार आहे. उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहणाचा समारंभ संपन्न होणार असून, या समारंभास मान्यवर नागरिक, स्वातंत्र्य सैनिक तसेच शासकीय-निमशासकीय अधिकारी कर्मचारी यांनी राष्ट्रीय पोषाखात उपस्थित रहावे असे, आवाहन तहसिलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्र/अभिलेख/कावि/५५०/२०२४

**मोहोळ येथील मा. तहसिलदार सो, यांचे कोर्टात**

बिसमिल्ला खलील शिकलकर, वय - ६१ वर्षे, धंदा घरकाम, रा. शिवाजी नगर, बँक मागे, लोणी स्टेशन, कदम वाक वस्ती, पुणे जि. पुणे. **} अर्जदार**

**विरूध्द**

१) मा. तहसिलदार सो, तहसील कार्यालय आवार, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर.
२) नगरपरिषद मोहोळ, ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस मा. मुख्याधिकारी मोहोळ नगरपरिषद, मोहोळ ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी. **} सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार बिसमिल्ला खलील शिकलकर हिचा जन्म ता.०१/०६/१९६३ रोजी मौजे मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचा यांचा जन्म दाखल्याची ता.०५/१२/२०२४ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जुन १९६३ चे अभिलेखात अर्जदार नामे बिसमिल्ला खलील शिकलकर हिचे जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला.

त्याअर्थी सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि. २५/२/२०२५ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन ३० दिवसाचे आत सक्षम अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. २४ /०१ /२०२५

लिपीक (शिक्का) सही /-
तहसिलदार सो,मोहोळ

## जाहीर प्रसिद्धीकरण

क्र/अभिलेख/कावि/५२८/२०२४

**मोहोळ येथील मा. तहसिलदार सो, यांचे कोर्टात**

शैला शिवाजी डोके,वय-३३ वर्षे, धंदा-घरकांम,रा. मोहोळ, ता. मोहोळ,जि. सोलापूर. **} अर्जदार**

**विरुध्द**

नगरपरिषद मोहोळ, ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस मा. मुख्याधिकारी मोहोळ नगरपरिषद, मोहोळ ता. मोहोळ,यांचेवर बजाविण्यात यावी. **} सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार शैला शिवाजी डोके हिचा जन्म ता. २८/०४/१९९१ रोजी मौजे मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार हिने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचा यांचा जन्म दाखल्याची ता.२४/१०/२०२४ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे एप्रिल १९९१ चे अभिलेखात अर्जदार शैला शिवाजी डोके हिची जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला.

त्याअर्थी सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/ हरकत असल्यास दि. २५/२/२०२५ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन ३० दिवसाचे आत सक्षम अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. २४ /१/२०२५

लिपीक (शिक्का) सही/-
मा. तहसिलदार सो, मोहोळ

## जाहीर प्रसिद्धीकरण

क्र/अभिलेख/कावि/ ५३६/२०२४

**मोहोळ येथील मा. तहसिलदार सो, यांचे कोर्टात**

मंगल आण्णा थोरात, वय वर्षे, धंदा घरकाम, रा. मोहोळ, ता. मोहोळ,जि. सोलापूर. **} अर्जदार**

**विरुध्द**

नगरपरिषद मोहोळ, ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस मा. मुख्याधिकारी मोहोळ नगरपरिषद, मोहोळ ता. मोहोळ,यांचेवर बजाविण्यात यावी. **} सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार हिची मुलगी अंजना आण्णा थोरात हिचा जन्म ता.२८/०८/१९८६ रोजी मौजे मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार हिने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदार हिच्या मुलीच्या जन्म दाखल्याची ता.२७/११/२०२४ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील ऑगस्ट १९८६ चे अभिलेखात अर्जदार हिची मुलगी अंजना आण्णा थोरात हिचा जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टातसामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केलाआहे.

त्याअर्थी याबाबत कोणाचा आक्षेप/ हरकत असल्यास दि. २५/०२/२०२५ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन ३० दिवसाचे आत सक्षम अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता २४/१/२०२५

लिपीक (शिक्का) सही/-
मा. तहसिलदार सो, मोहोळ

# दुचाकी वाहनांसाठी आकर्षक नोंदणी क्रमांकासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दुचाकी वाहनांसाठी सुरु होणाऱ्या टऌ-13 एळ मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक राखून ठेवण्याकरिता अर्ज स्विकारण्याबाबत प्रक्रिया सुरु करण्यात आली असून, दुचाकी वाहनांसाठी आकर्षक नोंदणी क्रमांकासाठी अर्ज करण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी केले आहे.

वाहनांची नवीन मालिका चालू होण्याच्या दिवशी प्रादेशिक परिवहन कार्यालयात गर्दी होते. त्यामुळे कार्यालयीन व्यवस्थेवर त्याचा ताण पडतो व नागरिकांनाही याचा त्रास होतो. नागरिकांना होणारा त्रास कमी व्हावा व त्यांना हवा असणारा आकर्षक नोंदणी क्रमांक उपलब्ध असल्यास त्यांना सुलभतेने मिळावा. यासाठी ज्या दुचाकी वाहन मालकांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहीत शुल्क भरून हवे असतील त्यांनी दिनांक 29 जानेवारी 2025 या कालावधीत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी 11.00 ते सायं 4.00 या वेळेत विहीत नमुन्यातील अर्ज सादर करावा. कार्यालयाच्या नवीन नोंदणी विभागात डीडी , पत्याचा पुरावा, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह जमा करावा, डीडी फक्त " Dy फळ.ड. SOLAPवफयांच्या नावे नॅशनलाईज अथवा शेड्युल्ड बँकेचा असावा.अजासीबत पत्याच्या पुराव्याची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक असेल.

एक नंबरकरिता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी दिनांक 29 जानेवारी 2025 रोजी सायं. 05.00 वाजता कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. यादीतील अर्जदारांना लिलावाकरिता जर जास्त रक्कमेचा डीडी जमा करावयाचा असेल त्यांनी दि. 30 जानेवारी 2025 रोजी सीलबंद लिफाफ्यात दुपारी 2.00 वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत जमा करावा. लिलावासाठी सादर केलेला डीडी 1000/- रुपये पेक्षा कमी रकमेचा नसावा. दिनांक 30 जानेवारी 2025 रोजी दुपारी 04.00 वाजता प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर यांच्या उपस्थितीत संबंधित अर्जदारासमोर लिफाफे उघडून ज्या अर्जदाराचे विनिर्दिष्ट शुल्कापेक्षा जास्तीत जास्त रकमेचा डीडी सादर केला असेल त्यास नमूद पसंती क्रमांक वितरीत केला जाईल.

एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून 180 दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर करून वाहन क्रमांक प्राप्त करून घ्यावा अन्यथा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल व फी सरकारजमा होईल. कोणताही विशिष्ट नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेली फी कोणत्याही परिस्थितीत परत करता येणार नाही अथवा त्याचे समायोजन करता येणार नाही. असेही प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी पत्रकान्वये कळविले आहे

**दुचाकी वाहनांच्या मालिकेचे वेळापत्रक (MH 13 ET)**

दि.29 जानेवारी 2025 -तिप्पट शुल्काचे अर्ज व परिवहन संवर्ग वाहनांसाठी नियमित अर्ज स्विकारणे वेळ -11 ते 04

दि.29 जानेवारी 2025 - सायंकाळी 05.00 वा. डबल आलेल्या अर्जाची यादी जाहीर.

दि.30 जानेवारी 2025 - दूपारी 2 वाजेपर्यंत बंद लिफाफ्यात लिलावासाठीचे डीडी स्विकारणे रु. 1000/- पेक्षा जास्त रकमेचे डीडी जमा करणे गरजेचे.

दि.30 जानेवारी 2025 -तिप्पट आलेल्या शुल्काच्या अजार्साठी व परिवहन संवर्ग वाहनांसाठी आलेल्या डबल अजार्चा लिलाव दुपारी 4 वाजता.

## पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर

फोन क्र. (०२१८६) २२३२५३,२२३०१३ फॅक्स क्र.(०२१८६)२२३००६

ई मेलः- comcpandharpur@gmail.com

### निविदा नोटीस

पंढरपूर नगरपरिषद खालील नमूद कामाकरिता बंद लखोट्यातून खुल्या दराच्या निविदा मागवित आहे. निविदापत्रके दिनांक- ०४/०२/२०२५ रोजी दु. ४ ०० वाजेपर्यंत विद्युत विभागाकडे विकत मिळतील. दिनांक- ०५/०२/२०२५ रोजी दु.४-०० वाजेपर्यंत भरलेली निविदापत्रके स्वीकारली जातील. बयाणा रकमेपोटीचे रकमेचा धनाकर्ष (डी.डी) द्वारे स्विकारणेत येईल. धनाकर्ष सोबत असलेशिवाय निविदापत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. दिनांक- ०५/०२/२०२५ रोजी दु.५०० वाजता (शक्य झाल्यास) हजर निविदाधारकांसमोर अथवा त्यांचे प्रतिनिधी समोर बंद निविदा पाकिटे मुख्याधिकारी यांचे कार्यालयात उघडणेत येतील. बंद लखोट्यावर ज्या त्या कामाचे नाव लिहावे. निविदा दोन पाकीट पद्धतीने स्विकारल्या जातील. पाकिट क्र. १ मध्ये १) बयाणा रकमेचा धनाकर्ष (डी.डी.), २) आयकर पॅन नंबर, ३)दुकान परवाना, ४)जी. एस. टी., ५) अनुभव संबंधी कागदपत्रे, ६) निविदेतील अटी व शर्ती मान्य असलेले साक्षांकण केलेले कागदपत्रे, ७) परिशिष्ट-अ, ८) EPF नोंदणी (आवश्यकतेनुसार), पाकिट क्र. २ मध्ये भरलेली निविदा सादर करावी. निविदाच्या अटी शर्ती वगैरे संपूर्ण माहिती सुट्टीखेरीज कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. कमी अथवा जादा दाराची निविदा मंजूर करणे अथवा नामंजूर करणेच अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे. त्याची कारणे दिली जाणार नाहीत. निविदा मागणी अर्जासोबत शासनाकडील नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सादर करणे आवश्यक आहे.

**कामाचा तपशील**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च | बयाणा रक्कम | कामाची मुदत | निविदा संचाची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | लोकमान्य विद्यालय पहिला मजला CCTV सर्वेक्षण यंत्रणा कार्यान्वित करणे. | ४९९५४४.00/- | ५000/- | १५ दिवस | ५00/- |
| २ | लोकमान्य विद्यालय दुसरा मजला CCTV सर्वेक्षण यंत्रणा कार्यान्वित करणे. | ४९९५४४.00/- | ५000/- | १५ दिवस | ५00/- |

नगरपरिषद कार्यालय,
पंढरपूर, दिनांक- २४/०१/२०२५.

सही/-
(डॉ. प्रशांत जाधव)
मुख्याधिकारी
पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर

# टाऊन प्लॅनिंगवर फारूक शाब्दी खवळले; ही तर हिटलरशाही सुरु आहे

# टाऊन प्लॅनिंगचा आराखडा रद्द करा किंवा दुरुस्ती करा; अन्यथा मोठे जन आंदोलन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने टाऊन प्लॅनिंगचे आरक्षण जाहीर झाले आहे.सोलापूर शहरातील अनेक धार्मिक जागा आरक्षित करण्यात आल्या आहेत.शहरातील मोठमोठ्या टोलेजंग इमारती असलेल्या नगराना झोपडपट्टी भाग म्हणून घोषित करण्यात आले आहे. शहरातील मोक्याच्या जागी खाजगी जागावर आरक्षण जाहीर करण्यात आले आहे.सोलापूर एमआयएमच्या वतीने या टाऊन प्लॅनिंगचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करण्यात आला आहे.फारूक शाब्दी यांच्या अध्यक्षतेखाली एमआयएम पक्षाच्या वतीने सोलापूर महानगरपालिका अधिकाऱ्यांना याबाबतचे निवेदन देऊन हा टाऊन प्लॅनिंगचा आराखडा रद्द करण्यात यावा किंवादुरुस्ती करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे.शुक्रवारी सायंकाळी महानगरपालिका आयुक्तांना एमआयएमपक्षाच्या वतीने निवेदन देऊन तीव्र शब्दांत संताप व्यक्त करण्यात आला आहे.

एमआयएम पक्षाचे राज्य कार्यकारी अध्यक्ष फारूक शाब्दी यांनी ही तर हिटलरशाही सुरू आहे अशा शब्दांत महानगरपालिकेचा निषेध केला.जर्मनी देशात तानाशाह हिटलर ज्यू लोकांच्या वस्त्यामध्ये अशाच प्रकारचे कडक नियम लावत होता,तशी पद्धत भारतात सुरू आहे की काय असे चित्र निर्माण झाले आहे.भारतात भाजपची सत्ता आल्यापासून एका विशिष्ट समाजाला टार्गेट केले जात आहे.भारत देशात सुरू असलेली हिटलर शाही बंद करणार,भारत देश हा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाने चालणारा देश आहे.हिटलरच्या नियमानुसार चालणार नाही अशी प्रतिक्रिया एमआयएमचे नेते फारूक शाब्दी यांनी दिली आहे.हा टाऊन प्लॅन रद्द करा किंवा दुरुस्ती करा अशी मागणी एमआयएम पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.अन्यथा मोठा आणि तीव्र स्वरूपात आंदोलन करण्याचा इशारा राज्य कार्याध्यक्ष फारूक शाब्दी यांनी दिला आहे. शुक्रवारी सायंकाळी महानगरपालिका आयुक्तांना एमआयएम पक्षाच्या वतीने निवेदन देताना गाझी जहागीरदार, तौफिक हत्तुरे, वाहेदा भंडाले, अझहर हुंडेकरी एजाज बागवान,बिस्मिल्ला सय्यद,याकूब शेख,राजा बागवान, सादिक नदाफ अशफाक बागवान, शजर सय्यद, नदिम डोणगांवकर, नसिमा कुरेशी, इस्लामोद्दीन शेख महीबुबअली कुरेशी मचिंद्र लोकेकर आदी उपस्थित होते.

## कटूसत्य शब्दकोडे




**उभे शब्द :** १) ख्रिश्चन धर्मियांचा एक सण, ख्रिसमस २) डोके ३) गुणी, प्रामाणिक वृत्तीचा ४) दह्यात पाणी मिसळून हे तयार करतात ५) जेवणासाठी बसलेली रांग ६) हात ८) एक पक्षी ९) आश्चर्य १०) नगरचे माजी खासदार- *** विखे-पाटील ११) एक भारतीय गोलंदाज-यजुवेंद्र *** १२) शर्ट १३) इच्छा १४) दिलेले आश्वासन, वचन १५) लहान मूल १६) एक मराठी अभिनेत्री-*** प्रभुणे १७) वेडसर (हिंदीत) १८) शर्टची गळ्याभोवतीची पट्टी १९) धावपट्टू (इंग्रजीत) २१) पावसाची आतुरतेने वाट पाहणारा पक्षी २२) वस्तूंवर लावलेला टॅक्स, कर २३) कंबर (हिंदीत) २४) आत, आतील बाजूस (हिंदीत) २५) जवळ, समीप २६) खोलगट २७) काजूच्या जोडीचा एक पौष्टीक पदार्थ २८) दोन आणि अर्धा २९) शिवसेनेचे मुखपत्र ३०) पोट ३१) वायू, वारा ३२) कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेली शिक्षणसंस्था ३४) शपथ (हिंदीत) ३५) मनुष्य ३६) शंभर धावांचा टप्पा ३७) गाडीची गती ३८) गुलाम ३९) मनी नाही ** अन् देवा मला पाव

**आडवे शब्द :** १) उत्तर महाराष्ट्रातील एक जिल्हा ३) खा. उदयनराजे यांचा लोकसभा मतदारसंघ ५) बीडच्या एक नेत्या-*** मुंडे ७) वायर, धातूचा तंतू ८) लहान मुलाचा सांभाळ करणारे आई वडील, एक भाजी प्रकार ९) छोटे शहर ११) एक अंमली नशिला पदार्थ १२) पतीची दुसरी बायको १३) शर्टला बटण अडकविण्यासाठी केलेली खाच १४) स्तुती १५) ढग (हिंदीत) १६) वेळ (हिंदीत) १७) पैंजण (हिंदीत) १८) पूर्वीचा एक साथीचा रोग १९) एक अभिनेत्री-*** टंडन २०) हनुमानाच्या हातातील शस्त्र २१) वाहन चालविणारा २२) लालू प्रसाद यादव यांचा पक्ष-राष्ट्रीय *** दल २४) दोन्हीमधील तफावत २५) होकारच्या विरूध्दार्थी २६) विषमच्या विरूध्दार्थी २७) पाण्यावर तरंगणारा एक पक्षी २८) महाराष्ट्राचे एक नेते -*** पवार २९) शुगर, शर्करा ३०) मोठ्या मनाचा ३१) पडून राहिलेली जमीन ३२) वाळूवर रेषा काढून भविष्य जाणण्याची पध्दत ३३) धमकी देणे, संयम, धीर ३४) संरक्षक आवरण ३५) पत्राचा सुरूवातीचा मजकूर ३७) बैलाच्या नाकात घातलेली दोरी ३८) दान करण्याची वृत्ती ३९) शिजवलेला तांदूळ ४०) दोन नद्यांचा मिलाफ ४१) सशाची आणि याची शर्यतीची गोष्ट प्रसिध्द आहे ४२) जावकच्या विरूध्दार्थी शब्द

## सुडोकु - 157

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 5 | 8 | 7 | 1 | | 9 | |
| | | | | 4 | | | | |
| 8 | 9 | 1 | | | 6 | 7 | | |
| 4 | | 9 | 1 | 3 | | | | 5 |
| | 6 | | | 9 | 8 | | 7 | 4 |
| 5 | 3 | 8 | 7 | | | 1 | | |
| | | 3 | | 2 | | 6 | 5 | 8 |
| 2 | | | | 8 | | | | 7 |
| | 8 | 7 | | | 5 | | | 2 |

## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**विकणे आहे**
सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.
संपर्कः 9881361260

|| श्री उमाप्रसिद्ध प्रसन्न ||
**R.K कन्स्ट्रक्शन्स्**
इन्फ्रास्ट्रक्चर, इंडस्ट्रीज, अपार्टमेंट यामध्ये सर्व सल्ल्याबाबत तत्पर...



* बांधकाम नकाशा
* इंटेरियर डिझाईन
* 3 D डिझाईन
* कॉन्ट्रॅक्टर वर्क्स
* बांधकाम परवाना
* स्टील डिझाईन
* इस्टिमेट
* साईट सुपरव्हिजन
* ब्लु प्रिंट्स
* टेंडर सर्व्हिसेस

संपर्क पत्ता :- इंजि. स्वप्निल पोपट कदम M.E. (Structure) B.E. (Civil)
Mo. 9552547272, 8788832033

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



दारू... अंमली पदार्थ... गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..



(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्अॅप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...
501% रिझल्ट

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# दिलीप कोल्हे यांच्या वतीने बचत गटातील महिलांना देवदर्शन यात्रा, महिलांनी कोल्हे परिवाराचे केले कौतुक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** तेजस्विनी महिला उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष, माजी उपमहापौर, शिवसेना शहर समन्वयक दिलीप कोल्हे यांच्या वतीने दरवर्षी बचत गटातील महिलांसाठी देवदर्शन यात्रा काढण्यात येते. याही वर्षी श्री दत्त महाराजांचे जन्म ठिकाण पिठापूर आणि अनेक आजू बाजूच्या देव दर्शन ठिकाणी दर्शन यात्रा काढण्यात आली. जवळपास बचत गटातील 100 महिला या यात्रेत सहभागी झाले.

गेल्या १२ वर्षापासून उत्तर भारत, दक्षिण भारत, कन्याकुमारी, बेंगलोर, मैसूर, अजमेर शरीफ, दिल्ली, आग्रा, राजस्थान, यासह अनेक ठिकाणी दिलीप कोल्हे यांच्या वतीने बचत गटातील शेकडो महिलांना देवदर्शन



सांस्कृतिक सहल यासह पर्यटनाची माहिती मिळावी यासाठी सहलीचा आयोजन करण्यात येतो. बचत गटातील महिला या गरीब कुटुंबातील असून त्यांना एवढ्या लांब जाता येत नाही, त्यांना जाता यावं देवदर्शन, सांस्कृतिक, पर्यटन आणि व्यावसायिक दृष्ट्या विविध राज्यातील माहिती मिळावी, यासाठी ही सहल आयोजित करण्यात येते.

अशी माहिती आयोजक दिलीप कोल्हे आणि माजी नगरसेविका मंगलाताई कोल्हे यांनी दिली.

आम्हीं बचत गटातील महिला असून काम केल्यानंतर आमचे घर चालते, मी कधी सोलापूरच्या बाहेर गेलो नाहीत परंतु बोलले परिवाराच्या मुळे आम्ही देशातील अनेक राज्यात जाऊन देवदर्शन केले महिलांचे व्यवसाय पाहिले त्यामुळे आम्हाला बाजारपेठेत का विकले जातात याची माहिती मिळाली त्यांच्या आयोजनाबद्दल बचत गटातील महिलांनी कोल्हे कुटुंबीयांची आभार मानले.

तेजस्विनी महिला उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष, माजी उपमहापौर, शिवसेना शहर समन्वयक दिलीप कोल्हे, काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष सुनील रसाळे, मराठा क्रांती मोर्चा समन्वयक संजय शिंदे, भाजपचे शहर चिटणीस शेखर फंड, माजी नगरसेविका मंगलाताई कोल्हे, बाळासाहेब सुरवसे, जयश्री माने, मनिषा कोल्हे, उषा नायडू, कविता चव्हाण, वैशाली अनुसये, अर्चना लांबतुरे, चैत्राली बाबर, वंदना जाधव, शोभा ननवरे, मल्लवा गोडसे, अनुराधा पोखरकर, सुनंदा पोखरकर, संगीता पोखरकर यांच्यासह अनेक महिला उपस्थित होते.

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे नातेपुते येथे जंगी स्वागत व सत्कार, सत्कारासाठी ६० फूट तुळशीचा हार

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री झाल्यानंतर सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे हे प्रथमच नातेपुते शहरात दौऱ्यानिमित्त आले होते. यावेळी शिवप्रसाद उद्योग समूहाच्या वतीने ग्रामविकास मंत्री व पालकमंत्री जयकुमार

गोरे, माजी खासदार रणजितसिंह नाईक -निंबाळकर, माजी आमदार राम सातपुते, फलटणचे आमदार सचिन पाटील यांचा क्रेनच्या सहाय्याने ६० फुटी तुळशीचा हार घालून



जंगी स्वागत व सत्कार नातेपुते येथील अण्णाभाऊ साठे चौक या ठिकाणी करण्यात आला. तसेच शिवप्रसाद उद्योग समूहाचे अध्यक्ष शरद (बापु) मोरे व जिल्हा परिषद सदस्य ऋतुजाताई मोरे यांच्या हस्ते पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा विठ्ठलाची मूर्ती देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

यावेळी मंचावर भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतन केदार ,माळशिरस तालुका भाजपा अध्यक्ष अ‍ॅड .शरद मदने, अ‍ॅड. बी.वाय. राऊत, भाजपा शहराध्यक्ष देवीदास चांगण, जिल्हा नियोजन समिती सदस्य सतीश सपकाळ राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष अक्षय भांड, शिवसेनेचे नेते राजकुमार हिवरकर, बळीराजा पतसंस्थेचे अध्यक्ष संतोष काळे, बाळासाहेब पांढरे, नगरसेवक दीपक काळे, सुरज चांगण,रावसाहेब पांढरे, तसेच माळशिरस तालुक्यातील भाजप, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे, शिवसेना शिंदे गटाचे व आर पी आय चे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मूलभूत सुविधायुक्त प्रभागाचा चौफेर विकास - किसन जाधव प्रभाग २२ येथे रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचे शुभारंभ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रभागातील नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी सोलापूर महानगरपालिका तसेच राज्यस्तरीय विविध शासकीय योजना अंतर्गत सर्वाधिक निधी खेचून आणून प्रभाग क्रमांक २२ चा चौफेर विकास साधला असल्याचे मनोगत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समितीचे विशेष निमंत्रित सदस्य किसन जाधव यांनी व्यक्त केलं. दरम्यान प्रभाग क्रमांक २२ येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना अंतर्गत सन २०२३-२४ या हेड अंतर्गत मंजुनाथ नगर डायमंड बेकरी ते गायकवाड घरापर्यंत रस्ता काँक्रिटीकरण कामाचे शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी प्रदेश



युवक सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड,हरिदास गायकवाड, श्रीमती जानकी बाई बापु जाधव, मागगुबाई विठ्ठल जाधव, अश्विनी अवि गायकवाड, छाया गायकवाड, ह.भ.प.श्रीमती शिंदे मावशी,बनसोडे मावशी,जॉन वेरूलीक, अजय अश्टुळ, मायकल जेवल, जॉन झंकेर, दिलीप अडसुळे, वासू हल्ली, दीपक डोईफोडे, कुणाल बाप्पू जाधव, राहुल नवगिरे, अविनाश जाधव, गौस शेख, सुरज चव्हाण, बाळकृष्ण जाधव, राजू बाप्पा जाधव, प्रशांत धोत्रे, ,शोभाताई गायकवाड, ,अश्विनी नवगिरे, शिवानी नवगिरे, सावित्री गायकवाड, मेघा गायकवाड,, लक्ष्मी कांबळे, लक्ष्मी गायकवाड, उषा गलांडे, सुवर्णा शेंडे, संगीता साबळे, नंदा चव्हाण, विजय गुरव, यांच्यासह प्रभागातील नागरिकांचे उपस्थिती होती.

प्रभाग क्रमांक २२ चा वाढता विस्तार पाहता येतील स्थानिक रहिवाशांच्या मागणीनुसार प्रभागात विकासकामे केली. स्थानिक रहिवाशांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी महापालिका आणि राज्य सरकारकडून निधी खेचून आणून प्रभागाचा चौफेर विकास साधला. या पुढील काळात नागरिकांना अत्याधुनिक सोयी सुविधा पुरवण्याचा मानस असल्याचेही यावेळी जाधव म्हणाले. तसेच या भागात नागरिकांना मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे याचे प्रभाग क्रमांक 22 च्या सर्वांगीण विकासासाठी विशेष सहकार्य लाभलं असल्याचेही यावेळी किसन जाधव यांनी सांगितले. दरम्यान नगरसेवक नागेश गायकवाड आणि किसन जाधव यांच्या माध्यमातून या भागात विकासाचे कामे पूर्ण होत असल्याने येथील स्थानिक नागरिकांनी नगरसेवक गायकवाड आणि जाधव यांचे आभार मानले.

# सोलापुरात २९ जानेवारीनंतर पाणीपुरवठा एक दिवसाने पुढे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विविध दुरुस्ती कामासाठी महावितरणकडून बुधवार, २९ जानेवारी रोजी विद्युत पुरवठा खंडित करण्यात येणार असल्याने शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी उजनी धरणातून होणारा उपसा त्या कालावधीत बंद असणार आहे. यामुळे त्या दिवशी आणि पुढील एका रोटेशनसाठी शहराचा पाणीपुरवठा एक दिवसाने पुढे ढकलण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी दिली. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीकडून १३२ केव्ही बाळे- चिंचोली काटी १३२ केव्ही लाईनचे कंडक्टर ओढणे या दुरुस्ती कामासाठी बुधवार, २९ जानेवारी रोजी सकाळी ८ ते संध्याकाळी ६ यावेळेत शटडाऊन घेत वीज पुरवठा खंडित करण्यात येणार आहे. त्यामुळे पाकणी जलशुध्दीकरण केंद्रासाठी १३२ केव्ही चिंचोळी काटी सबस्टेशनहून येणारी ३३ केव्ही लाइन बंद राहणार आहे. या कामामुळे पाकणी जलशुध्दीकरण केंद्र येथून पाण्याचा उपसा कमी होणार असल्याने बुधवार, २९ जानेवारी रोजीचा शहरातील काही भागातील पाणीपुरवठा उशिरा, कमी वेळ, कमी दाबाने व तसेच यानंतर १ रोटेशन पाणीपुरवठा पुढे जाणार आहे.त्यामुळे नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन सार्वजनिक

आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी केले आहे.

# प्रा. संतोष शेंडे यांना पीएचडी पदवी प्रदान




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे डॉ. मामासाहेब जगदाळे कृषि महाविद्यालयातील कृषि विस्तार विभागाचे सहाय्यक प्राध्यापक संतोष शेंडे यांना वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या 26 व्या दीक्षांत समारंभामध्ये विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्र मणी यांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली.

हा दीक्षान्त समारंभ महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी राधाकृष्णन, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थित पार पडला.

प्रा. शेंडे यांनी यांनी जागतिक बँक व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प या प्रकल्पाचा लाभार्थी शेतकऱ्यांवरती होणारा परिणाम या विषयावरती शोध प्रबंध सादर केला आहे.

या शोध कायार्साठी शासकीय कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. राकेश अहिरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

त्यांच्या या यशाबद्दल श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.बी. वाय. यादव , उपाध्यक्ष नंदन जगदाळे सचिव पी. टी. पाटील सहसचिव ए .पी. देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे ,प्राचार्य पी. आर गलांडे व महाविद्यालयातील सर्व स्टाफ यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# अपघाती मृत्यूला निमंत्रण देणारे शहरातील बंद सिग्नल, बंद सीसीटीव्ही कॅमेरे तातडीने चालू करा- कॉ.नरसय्या आडम मास्तर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरात रस्त्याच्या दुतर्फा अतिक्रमण ही आहे. यामुळे अनियंत्रित व बेजबाबदार वाहतुकीचे प्रमाण वाढलेले आहे. याचे प्रमुख कारण स्मार्ट सिटी व विकसनशील शहरातील निकषाप्रमाणे रस्त्यांची गुणवत्ता, दर्जा नाही. राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गांचे शहरांतर्गत मुख्य रस्त्यांना जोडल्यानंतर केल्या जाणाऱ्या वाहतुकीच्या नियमांचे चिन्हांकन व निदेर्शाचे फलक बऱ्याच ठिकाणी दिसत नाहीत. सर्वात महत्वाचे म्हणजे वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी रस्त्यातील दुभाजकांची दुरावस्था, आवश्यक त्या ठिकाणी गतिरोधकाच्या नियमाप्रमाणे गतिरोधकांचा अभाव, चौकाचौकातील बंद अवस्थेतील सिग्नल, बंद अवस्थेतील सीसीटीव्ही या सर्व बाबींमध्ये समन्वयाचा अभाव यामुळे शहरात अपघात



व अपघाती मृत्यूची मालिका अद्याप सुरूच आहे.अशी चिंता माकपचे ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांनी व्यक्त केली.

शुक्रवार दिनांक 24 जानेवारी रोजी सोलापूर महानगर पालिका आयुक्त तथा प्रशासक शीतल तेली उगले यांना ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ नरसय्या आडम मास्तर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाद्वारे निवेदन देण्यात आले. या शिष्टमंडळात माकप चे जिल्हा सचिव अ‍ॅड एम एच शेख, कॉ युसुफ शेख मेजर , अ‍ॅड. अनिल वासम, कॉ विल्यम ससाणे, कॉ.दाउद शेख, कॉ.नरेश दुगाणे, आदींची उपस्थिती होती.

या निवेदनामार्फत शहरांतर्गत जड वाहतुकीमुळे होत असलेली जीवित हानी, वित्त हानी टाळण्यासाठी वाहतुकीच्या नियमांचे पालन, वाहतूक शाखेकडून वाहनांची वैधता, वेग, कागदपत्रे आदींची तपासणी करण्यात यावी.

महामार्गावरील

गतिरोधकाप्रमाणे गतीरोधक बसविण्यात यावे, बंद असलेले सिग्नल, बंद असलेले सीसीटीव्ही तात्काळ चालू करावे. तसेच हैद्राबाद रोड व अक्कलकोट रोड मार्गे शांती चौक ते गुरुनानक चौक या नागरिकांच्या प्रचंड वर्दळीच्या मार्गावरून होत असलेली जड वाहतूक, माल वाहतूक कायमस्वरूपी बंद करून याला उपलब्ध असणाऱ्या पयार्यी मागार्चा अवलंब करावा व त्यास बाह्य वळण द्यावे अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने करण्यात आली.

# पेण... जरा डोकं चालवा! आपली सुरक्षा आपली जबाबदारी

## पेण उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात रस्ता सुरक्षा प्रात्यक्षिके

**पेण (कटूसत्य वृत्त):-** पेण उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात जयपाल पाटील यांची रस्ता सुरक्षा अभियान कार्यक्रम निमित्ताने आपली सुरक्षा आपली जबाबदारी या अनुषंगाने स्वयंपाक घरात आग लागणे हार्ट अ‍ॅटक वाहन चालवताना कोणती खबरदारी घ्यावी या बाबत व्याख्यान आणि प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करुन दाखवित जयपाल पाटील आणि आपत्ती निवारण तज्ञ संदीप ढापरे यांनी आरटीओ अधिकारी वाहतूक पोलीस पळस्पे,दादर सागरी पोलीस पेण आणि जिते प्राथमिक आरोग्य केंद्र कर्मचारी वगार्ला संकटकाळात कसे काम करावे याचा प्रात्यक्षिक याव्दारे अनुभव करुन दिला .आरटीओ प्रशासन पेण अधिकारी महेश देवकाते याचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक अधिकारी माधव सुर्यवंशी यांच्या उपस्थितीत हा



कार्यक्रम वाहनचालक व आलेले नागरिकांना अनमोल मार्गदर्शन माहिती करुन देणारा ठरला..

अलिबाग येथील डॉ.जयपाल पाटील यांना राज्य व केंद्र शासनाने आपत्ती व्यवस्थापन तज्ञ मास्टर ट्रेनर म्हणून रायगड जिल्ह्यातील अनेक शासकीय कार्यालयात ग्रामपंचायती, माध्यमिक शाळा कॉलेज यामधे यासाठी विशेष आमंत्रित करुन आपत्तीच्या संकट समयी आपली सुरक्षा आपल्या हाती या विषयाला अनुसरून पुरपरिस्थीती ,आग लागणे , आरोग्य समस्या, याबाबत कोणते महत्वाचे नंबर शासनाने आपत्ती काळात जाहीर केलेत त्या वेळी लागणारी मदत महिला सुरक्षा स्वयंपाक घरात सिलेंडर लिकेज होणे याबात कशा प्रकारे महिलांनी दक्षता घ्यावी याचे सुंदर विवेचन व प्रात्यक्षिके सादर करुन दाखवली.

रस्ता महामार्गावरील वाहतूक सध्या गजबजलेली असते अशावेळी घरी आपली कोणीतरी वाट पहाते यासाठी डोकं ठिकाणावर ठेवून वाहतूक नियम पाळुन सुरक्षीत प्रवास हाच आपल्या आयुष्याला सुरक्षा प्रदान करणारा हेतू लक्षात कायम ठेवा असे सांगितले.

सध्या हृदय विकाराचा झटका येणे ही मोठी समस्या आहे.

यावेळी रुग्णाला काय करावे याचे प्रात्यक्षिक त्यांनी आरटीओ अधिकाऱ्यांवर केले एकंदर सुरेख मार्गदर्शन आणि त्याला जोड दिली ती फायर ब्रिगेड सेफ्टी तज्ञ संदीप ढापरे यांनी आग कशी विझवावी याबाबत महिला वगार्ला सोबत घेऊन प्रात्यक्षिके केली रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत हा कार्यक्रम जिते आरटीओ कार्यालयात आणि मैदानावर सुंदर सादर झाला.

या कार्यक्रमाप्रसंगी आरटीओ कार्यालयीन अधिकारी कर्मचारी, वाहतूक पोलीस पळस्पे सहायक अधिकारी कर्मचारी दादर सागरी पोलीस अधिकारी कर्मचारी व जिते प्राथमिक आरोग्य केंद्र रुग्णवाहिका कर्मचारी आरोग्य सेविका वाहन चालक,आणि कार्यालयात कामानिमित्त आलेले नागरिकांची मोठी उपस्थिती होती.

# प्रजासत्ताक दिन गणवेशाविनाच; दोन दिवसांत गणवेश पोचविण्याचा 'शिक्षण'चा दावा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** यंदाच्या शैक्षणिक वर्षात शालेय विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यदिनीही पहिले गणवेश मिळाले नव्हते. आता प्रजासत्ताक दिन दोन दिवसांवर येऊन ठेपला आहे. तरीही सर्व शाळांपर्यंत दुसरे गणवेश पोचू शकले नाही. मात्र, गणवेश तयार असून या दोन दिवसांत सर्व विद्यार्थ्यांना गणवेश मिळतील, असे प्राथमिक शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. चालु शैक्षणिक वर्षात कोट्यवधी रुपये खर्चून एकाच कंपनीकडून कापड खरेदी व महिला आर्थिक महामंडळामार्फत महिला बचत गटांकडून शिवून दोन गणवेश देण्याचा निर्णय तत्कालीन एकनाथ शिंदे सरकारने घेतला होता. मात्र, वेळेत कापड न मिळाल्याने इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनीही पहिले गणवेश मिळू शकले नव्हते. ते निम्मे शैक्षणिक सत्र संपायला आल्यावर मिळाले.

त्यानंतर विद्यार्थ्यांना स्काऊट गाईडच्या दुसऱ्या गणवेशाची प्रतीक्षा होती. आता प्रजासत्ताक दिन दोन दिवसांवर आले असून



शैक्षणिक वर्ष संपायला तीन महिने उरले आहेत. मात्र, अद्याप ७४ हजार ४५० विद्यार्थ्यांसाठीचे गणवेश शाळांपर्यंत पोहोचले नाहीत. तयार गणवेशाची स्थिती पाहता आणखी १६ हजार ३६६ गणवेश लागणार आहेत. मात्र, प्रजासत्ताक दिनापूर्वी उर्वरित विद्यार्थ्यांनाही गणवेश मिळतील, असे प्राथमिक शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

जिल्ह्यातील सव्वालाख विद्यार्थ्यांना दुसरे स्काऊट गाईडचे गणवेश दिले आहे. रोज शाळांना गणवेशाचे वाटप केले जात आहे. त्यासाठी गणवेश शिवून तयार आहेत. उर्वरित विद्यार्थ्यांसाठीचे गणवेश वाटप होईल. प्रजासत्ताक दिनापूर्वी सर्व विद्यार्थ्यांना गणवेश मिळतील, या दृष्टीने नियोजन केले आहे.

– कादर शेख, प्राथमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर

– कादर शेख, प्राथमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर गणवेश वाटपाची स्थिती

१,९१,७५८-एकूण विद्यार्थी,१,७५,३९२-शिवून तयार,१,१७,३०८-शाळांना पाठवलेले,५८,०८४-

शाळांना पाठवण्यासाठी तयार,७४,४५० गणवेश न मिळालेले विद्यार्थी.

# उज्ज्वल भविष्यासाठी मुलींना सक्षम करूया- विशाल भोसले सेवासदन प्रशालेत बालिका संवाद कार्यक्रम संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** देशातील मुलींचे भविष्य उज्ज्वल करायचे असेल, तर त्यांना सक्षम करणे ही काळाची गरज आहे. मुली सक्षम तेव्हाच होऊ शकतात, जेव्हा कुटुंब, समाज आणि सरकार त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतील. बालिका ही कुटुंबाची आणि समाजाची जबाबदारी आहे, हे मानून त्यांच्यावर विश्वास ठेवणे आणि त्यांना समान संधी दिली पाहिजे, असे प्रतिपादन बाल विकास प्रकल्प अधिकारी विशाल भोसले यांनी आज येथे केले. राष्ट्रीय बालिका दिनानिमित्त माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्यूरो सोलापूर यांच्या वतीने सु.रा. मुलींची प्रशाला, सेवासदन येथे बालिका संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री भोसले बोलत होते.

यावेळी सहाय्यक क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंबादास यादव, बाल सरंक्षण अधिकारी



रेश्मा गायकवाड, मुख्याध्यापिका राजश्री रणपिसे आणि माजी अधिकारी सतीश घोडके, पर्यवेक्षक स्वाती पोतदार, विस्तार अधिकारी ऋषिकेश जाधव आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

रेश्मा गायकवाड म्हणाल्या की, राष्ट्रीय बालिका दिनाचे औचित्य साधून, मुलींच्या आकांक्षा आणि मेहनतीने समाजाला प्रेरणा मिळत आहे. मुलींनी शिक्षण आणि विविध क्षेत्रांमध्ये केलेल्या प्रगतीमुळे समाजात सकारात्मक बदल होत आहे. आजच्या मुली ही फक्त घरासाठी नव्हे, तर देशाच्या उज्ज्वल भवितव्यासाठीही महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. मुलींच्या स्वप्नांना पाठबळ देऊन त्यांना यशस्वी करण्यासाठी पालक, शिक्षक आणि समाजाने सातत्याने प्रयत्नशील राहावे.

मुख्याध्यापिका श्रीमती रणपिसे यांनी सेवासदन संस्थेच्या संस्थापिका तथा थोर महिला समाजसुधारक रमाबाई रानडे यांनी महिलांच्या सामाजिक सुधारणाविषयी केलेल्या कार्याची माहिती दिली.

देशातील मुलींना सक्षम, शिक्षित आणि स्वावलंबी बनवणे हा राष्ट्रीय बालिका दिनामागचा खास उद्देश असून देशातील मुलींना त्यांचे अधिकार आणि हक्क यांबाबत जागृत करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून बेटी बचाओ बेटी पढाओ, सुकन्या समृद्धी योजना, उडान, किशोरवयीन सक्षमीकरण योजना, मिशन वासल्य, पोषण अभियान, विविध क्रीडा व शैक्षणिक उपक्रम आणि योजनांच्या माध्यमातून मुलींचे सक्षमीकरण होत आहे, असे अंबादास यादव यांनी प्रास्तविकेतून सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार दिपाली बोरसे यांनी केले. बालिका दिनानिमित्त विद्याथीर्नीसाठी मला अपेक्षित असेलेला भारत देश, सुकन्या समृद्धी योजनेचे १० वर्ष, विकसित भारतामध्ये महिलांचे योगदान विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आले होते. स्पधेर्चे परीक्षण लक्ष्मी विश्वेश्वर कमळे, दिपाली संजय बोरसे, मीरा राहुल राक आणि स्वप्ना पुष्कराज केळकर यांनी केले. विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे- प्रथम क्रमांक कु. स्नेहा गुरुनाथ नलावडे, द्वितीय कु. धनश्री गणेश साळुंखे, तृतीय कु. विजयालक्ष्मी विकास झांबरे, उत्तेजनार्थ कु. पायल हरी जगताप आणि कु. कांचन विष्णु पाटील आणि प्रश्नमंजुषा स्पधेर्तील विजेते पुढीलप्रमाणे- कु. मिस्बाह अब्दुल कादर मुजावर, कु. भाग्यलक्ष्मी काशिनाथ दोडमनी, कु. प्रज्ञा विशाल कांबळे, कु. तनुजा शरद पवार, कु. विजयालक्ष्मी विकास झांबरे यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी बेटी बचाओ बेटी पढाओ ची सामूहिक प्रतिज्ञा घेण्यात आली.

कार्यक्रमासाठी कार्यालय सहायक जे एम हन्नुरे, सूरज जाधव, शशीकांत यादव, रोहित यादव, शिपाई स्वाती माने आदींनी परिश्रम घेतले.